**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २८ एप्रिल २०२५**

**ठळक बातम्या**

1. **मुंबईत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चे भव्य आयोजन; पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटनासाठी उपस्थित राहणार- उद्योग मंत्री उदय सामंत यांची माहिती.**
2. **राज्यात हजारपेक्षा जास्त सेवा लोकसेवा कायद्यांतर्गत अधिसूचित करण्यात आल्या असून त्यातल्या बहुतेक सेवा ऑनलाईन उपलब्ध होतील अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही.**
3. **शेती महामंडळाच्या २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाकडून घरं देणार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय.**
4. **या आठवड्यात विदर्भात कमी अधिक प्रमाणात राहणार वादळी पर्जन्यमान, आज गडचिरोली मध्ये ऑरेंज अलर्ट.**

**---------------------------------------**

**वेव्हज**

**मुंबई बीकेसी येथील जियो वर्ल्ड सेंटर येथे १ मे पासून ४ मे २०२५ पर्यंत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाचे १ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज बीकेसी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. पंतप्रधान मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही सहभाग राहणार आहे. या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री आणि मंत्रीस्तरीय अधिकारी, तसच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार आणि निर्मातेही कार्यक्रमात सहभागी होणार असल्याच त्यांनी सांगितल. या चार दिवसीय सोहळ्यात भारत**

पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल.

-----------------------------------------

लोकसेवा हक्क

लोकशाही व्यवस्थेत सरकारने जर संविधानाने दिलेले अधिकार मानले नाहीत, तर त्याविरोधात दाद मागण्यासाठी लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अस्तित्वात आल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीची दशकपूर्ती आणि प्रथम सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यात हजारपेक्षा जास्त सेवा या कायद्यांतर्गत अधिसूचित केल्या असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. यातल्या बहुतेक सेवा या ऑनलाईन तत्वावरही राबवल्या जाणार आहेत.-

*ऑनलाइन असलेल्या सेवांची संख्या अजूनही कमी आहे. त्या जवळपास साडेपाचशे सहाशे सेवाआपण ऑनलाइन दिले आहेत. त्यामध्ये जवळजवळ तीनशे सेवा या ऑनलाइन आणायच्या आणि जवळपास सव्वाशे सेवा या ऑनलाइन आहेत. पण त्या कॉमन पोर्टलवर आपल्याला उपलब्ध नाही आहेत आणि म्हणून त्यासंदर्भात आपण 15 ऑगस्ट ची एक सगळ्यांना डेडलाईन दिलेली आहे.*

या संदर्भात मेटाशी संपर्क साधून गव्हर्नन्स व्हॉटसॲपवर उपलब्ध करून देण्यासाठीही आपण प्रयत्नशील असल्याचं फडनवीस म्हणाले. सामान्य प्रशासन विभाग आणि महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या संयुक्त विद्यमाने सह्याद्री अतिथीगृह इथं हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्यासह प्रशासनातले वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

-----------------------------------------

विजय वडेट्टीवार

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा मुख्य हेतू म्हणजे दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करून भारतातील एकात्मता भंग पाडण आणि देशात अस्थिरता निर्माण करण हा आहे. दहशतवादी आणि त्यांच्या पाठराखण करणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे. सरकार जी कारवाई करेल त्याला काँग्रेसचा पाठिंबा आहे असं ज्येष्ठ काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हंटलं आहे........

*पाकिस्तान में इस तरह टेररिस्ट ने कलमा पढ़ने को लगाना तो इसके पीछे की पाकिस्तान की राजनीति अपने देश को नुकसान पहुंचाने की है। यही स्पष्ट होता है इसी को लेकर हिंदुस्तान में हिंदू मुस्लिम को बांटने का काम नहीं होना चाहिए। वो टेररिस्ट को कोई जात पात धर्म पंथ नहीं होता है। देश को तकलीफ देना, देश को बर्बाद करना यह उनका उद्देश्य होता है।तो हमारी यही राय है कि किस स्थान को ये असली करने वाली शक्तियां जो है, उसके बारे में सरकार जो भी कार्रवाई करे, उसके लिए कांग्रेस पूरीज़ोर से उनके साथ में है ।*

भारताच्या अखंडतेसाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी अशा देशविघातक प्रवृत्तींना मोडून काढण अत्यावश्यक आहे. दरम्यान, विजय वडेट्टीवार यांचं वक्तव्य म्हणजे असंवेदनशीलतेचा कळस आहे. काश्मीरमध्ये हिंदूंना टार्गेट केलं जातं हे वेळोवेळी सिद्ध झालं आहे. मग काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार कोणत्या जगात वावरत आहेत "दहशतवाद्याला जात-धर्म नसतो" असं म्हणून वडेट्टीवार कोणाला खूश करू पाहत आहेत? काँग्रेस नेते दहशतवाद्यांना "निर्दोष" ठरवण्याचा प्रयत्न करताहेत का? असा सवाल महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

---------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे

शेती महामंडळाच्या सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांनी महामंडळ विकसित करण्यासाठी आपल योगदान दिल आहे. त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना राहण्यासाठी योग्य अशा सदनिका म्हाडाच्या माध्यमातून बांधून देण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या संचालक मंडळाची ३२७ वी बैठक मंत्रालयातील महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेती महामंडळाच्या १४ शेतमळ्यांवर २ हजार ९६६ निवासस्थाने आहेत. यापैकी १ हजार ७८६ निवासस्थाने राहण्यास अयोग्य ठरविण्यात आली आहेत. त्यामुळे ही निवासस्थाने रिक्त करण्याचा प्रस्ताव महामंडळान बैठकीसाठी ठेवला होता. यावर चर्चा करताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेती महामंडळाच्या सर्वच सुमारे २२ हजार कर्मचाऱ्यांना म्हाडाच्या माध्यमातून चांगली घरे उपलब्ध करुन देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला. गिरणी कामगारांप्रमाणे या कामगारांनाही चांगली घरे मिळाली पाहिजेत अशी भूमिका त्यांनी यावेळी घेतली.

---------------------------------------

महाराजस्व अभियान

राज्य शासनान पारदर्शी आणि गतीमान सरकारच धोरण ठरविल आहे. शासकीय कार्यालयातील काम सहजपणे आणि विनातक्रार होण्यासाठी यंत्रणा राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या आवश्यक कामांसाठी आता प्रत्येक मंडळात महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात छत्रपती शिवाजी महाराज, महाराजस्व समाधान शिबीराचे आज उद्घाटन करण्यात आले. शेतकऱ्यांना मोफत वीज, लाडकी बहिण आदी योजनांच्या अंमलबजावणीसोबत मेळघाटातील रस्ते जोडणीचा निर्णय घेण्यात आला असल्याच त्यांनी सांगितल.

---------------------------------------

हवामान

विदर्भात या संपूर्ण आठवड्यात कमी अधिक प्रमाणात वादळी पर्जन्यमान राहण्याचा इशारा नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान दिला आहे.  आज गडचिरोली जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह वादळ आणि हलक्या पर्जन्यवृष्टीचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून अमरावती, वर्धा, नागपूर, चंद्रपूर ,भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.  उद्या देखील याच जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमान राहू शकतं. उर्वरित आठवड्यात देखील विदर्भातील विविध जिल्ह्यांमध्ये कमी अधिक प्रमाणात अशाच प्रकारच वातावरण कायम राहील. दरम्यान वादळी पर्जन्यमानामुळ कमाल तापमानात किंचित घट झाली असून अकोला इथं  42 पूर्णांक  4 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची आज नोंद करण्यात आली, तर नागपुरात 39. 2अंश  सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

---------------------------------------

आयपीएल

इंडियन प्रिमियर लीग-आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स संघात सामना होणार आहे. जयपूरमधल्या सवाई मानसिंग स्टेडियमवर संध्याकाळी ७.३० वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

---------------------------------------

वलमाझरी ग्रामपंचायत

भंडारा जिल्ह्यात साकोली तालुक्यातल्या वलमाझरी ग्रामपंचायतीन संपूर्ण कर भरणाऱ्या नागरिकांना विमानवारी सह विविध बक्षिसं देण्याचा निर्णय घेतला

**आहे. काल झालेल्या ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत हा निर्णय घेण्यात आला. येत्या १५ मे पर्यंत सर्व प्रकारच्या घर करासह पाणीपट्टी आणि त्यापूर्वीचे सर्व कर जे भरतील अशा लाभार्थ्यांचा लकी ड्रॉ काढण्यात येईल. धान्यवाटप, अभयारण्य सफारी अशा बक्षिसांचा यात समावेश आहे.**

**-----------------------------------------**